Vol 6 Issue 2 Nov 2016

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 2 | November - 2016

Review Of Research

# *"भोगले जे दुःख त्याला ... एक मुस्लीम आत्मचरित्र"*

*प्रा. डॉ. शकील शेख*
*प्रमुख, मराठी विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,*
*ता. बार्शी, जि. सोलापूर,*

## *प्रस्तावना :*

साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असतो, कोणत्याही साहित्याची निर्मिती ही समाजातूनच होत असते. साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध असून साहित्याचा समाजावर समाजाचा साहित्यावर प्रभाव पडत असतो. साहित्याची निर्मिती ही मानवी भाव-भावना, सुख-दुःख, मानपान, संघर्ष, जिद्द, चिकाटी, लालचा, वैर अशा विविध गोष्टीतून होत असते. लेखक आपल्या मनातील विचार, साहित्यांतील विविध प्रकारांच्या माध्यमातून व्यक्त करत असतो. कवितेपासून आत्मकथनापर्यंतच्या या साहित्य प्रकारात लेखकाने आपल्या भाव-भावना चित्रित केलेल्या असतात.

स्वातंत्र्यानंतर बहुजन समाजातील तरूण वर्ग शिकून पुढे आला. आपल्या भाव-भावना साहित्यांच्या माध्यमातून व्यक्त करू लागला. यात बहुजन समाजातील सर्वच घटकांचा समावेश होता. यातूनच १९६० नंतर मराठी साहित्यात विविध प्रवाह निर्माण झाले. या प्रवाहांपैकी एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे मुस्लीम मराठी साहित्य होय.

मुस्लीम मराठी साहित्य म्हणजे मुस्लीम लेखकाने मराठी भाषेच्या माध्यमातून मुस्लीम समाज जीवनाचे सर्वांगिण असे केलेले चित्रण होय. या चित्रणातून मुस्लीम मानसिकतेचा वास्तवतेच्या पातळीवर चित्रित होणे अपेक्षित असते.

मुस्लीम मराठी साहित्यातून कवितेपासून आत्मचरित्रापर्यंतच्या विविध प्रकारामध्ये कमी-अधिक प्रमाणात लेखन झालेले दिसून येते.आपल्या मनातील भावना, जीवनानुभवातील वेदना कवितेतून जसा कवी प्रभावीपणे मांडू शकतो तशाच प्रकारे तो आत्मचरित्राच्या माध्यमातून सुध्दा आपल्या भावना, वेदना प्रभावीपणे मांडू शकतो. त्यामुळे अलीकडच्या कालखंडात अनेक लेखकांनी आत्मचरित्रे लिहिली, त्यात मुस्लीम मराठी आत्मचरित्रकारांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

मुस्लीम मराठी आत्मचरित्रांच्या वाटचालीचा विचार केल्यास 'माझ्या दर्यावर्दी जीवनाची भरती ओहोटी' हे फकीर महमंद जुवले लिखीत पहिले आत्मचरित्र होय. यानंतर 'संधिप्रकाश', शांतादेवी तडवी 'मला उद्ध्वस्त व्हायचंय', मलिका अमर शेख 'मुस्लीम महार', इब्राहिम खान 'जाग्या झालेल्या सावल्या', डॉ. अजीज नदाफ 'जिहाद', हुसेन जमादार 'चाकाची खुर्ची', नसीमा हुरजुक 'भोगले जे दुःख त्याला' आशा अपराध ही आत्मचरित्रे लिहिली गेली.

'भोगले जे दुःख त्याला' या आत्मचरित्राचे लेखन करणाऱ्या आशा अपराध यांचा जन्म १४ एप्रिल १९५२ साली कोल्हापूरात झाला. त्यांनी मोठ्या जिद्दीने एम.ए., बी.एड., एम.फिल पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्या कोल्हापूरमध्ये प्राध्यापिका म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात कार्यरत आहेत. आशा अपराध यांचे 'भोगले जे दुःख त्याला..' हे आत्मचरित्र हृदयस्पर्शी असे आहे.

'भोगले जे दुःख त्याला...' हे आत्मचरित्र २००८ साली प्रकाशित झाले असून प्रा. आशा अपराध यांनी आपल्या जन्मापासून २००६ पर्यंतचा म्हणजे त्रेपन्न वर्षांचा पट प्रस्तुत आत्मचरित्र चित्रित केला आहे.

आशा अपराध आपल्या आत्मचरित्र लेखनामागची भूमिका स्पष्ट करताना म्हणतात की, माझं जगणं इतरांना प्रेरणा देणारं असेल यासाठी मी लिहावं असा अनेकांनी आग्रह केला आणि माझ्याही मनात आजवर जे साचत गेलं ते रितं व्हावं अशी इच्छा होती म्हणून आत्मचरित्र लिहिलं. लेखिकेला केवळ आपलं दुःख किंवा संघर्ष चित्रित करावयाचा म्हणून आत्मचरित्र लिहायचं नव्हतं तर आत्मचरित्र लिहिण्यामागे जो हेतू होता तो स्पष्ट करताना त्या म्हणतात, "माझी जडणघडण ज्या समाजात, ज्या माणसांच्यात घडली, त्याबद्दलही मला बोलायचं होतं. चांगली माणसं, वाईट माणसं, चांगले क्षण, वाईट क्षण... हे सगळं मला मिळालेलं वरदान आहे, असं



मला वाटतं, मला या सर्वांच्याबद्दल सांगायचं होतं"[१]

आशा अपराध यांनी आपल्या जडणघणीचे चित्रण आपल्या आत्मचरित्रातून केले. आत्मचरित्र लिहून पूर्ण झाल्यानंतर ते प्रकाशनापूर्वी त्यांनी आपल्या नवऱ्यास वाचण्यासाठी दिले. उच्चशिक्षित आशाबाईंचा नवरा मात्र अल्पशिक्षित त्याने तासनतास् बसून आत्मचरित्र वाचले आणि ते वाचून झाल्यानंतर तो म्हणतो, "ऐसा कैसा हुआ ? तेरे बरोबर ऐसा की वागते आया मै ? मेरे तो कुछ भी याद में नई, और तू कुछ भी बिसरी नई"[२] नवऱ्याला काहीही आठवत नाही आणि बायको काहीही विसरत नाही. आशा अपराध यांनी आपल्या जीवनात फार काही सोसले आहे, ते सोसलेलं सांगण त्या टाळण्याचा प्रयत्न करतात, तरी त्यांच्या लेखनातून दुःखाच्या विविध छटा जाणवत जातात.

आशा अपराध आपल्या वडीलांना 'भई' म्हणत. 'भई' ब्रिटिश काळात एम.ए. (इंग्लिश) शिकलेले. कोल्हापूरजवळ राहिलेल्या पोलंडच्या युध्दकैद्यांना ते इंग्लिश शिकवत. ब्रिटिश गेले आणि 'भई' वर संकटाची मालिकाच सुरू झाली. 'भई' नी सायकलचे दुकान टाकले ते गांधी हत्येनंतर जाळपोळीत उद्ध्वस्त झाले. आशाला जीवनात जर कोणाचा आधार होता तर तो 'भई' चा. भईनी आशाला चांगले संस्कार दिले होते. आशा चौदा वर्षाची होती तेव्हा 'भई' चा मृत्यू होतो आणि कोवळ्याा वयातली आशा आपल्या आईच्या तावडीत सापडते. आशाच्या जन्मापासूनच आईने आशाची अनेक प्रकारे परवड केली हाती. आशा हुशार आहे, तिला शिकायचे असते पण आई तिची शाळा बंद करते आणि नात्यातल्या मुलाशी सक्तीनं लग्न जावून देते. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी आशा चार मुलांची आई झालेली असते. असे असले तरी आशाची शिकण्याची इच्छा काही केल्या तिला स्वस्थ बसू देत नाही. नवरा ट्रक ड्रायव्हर, नवऱ्याने सतत केलेला अन्याय सहन करत आशा शिकत राहते. घरचं सांभाळून ती बाहेरून एस.एस.सी., बी. ए., बी.एड., एम.ए., एम.फिल करते आणि प्राध्यापक होते, मुलींना शिकवते, त्याचं सुस्थळी लग्न करून देते.

आशा अपराध यांची परवड बालपणापासून सुरू होते ती शेवटपर्यंत थांबत नाही. बालपणी 'भई' हेच काय ते 'आशा' साठी एक आनंदाची झुळूक पण 'भई' च्या मृत्यूनंतर आपल्या आईकडून होणारा अत्याचार आशाला क्षणोक्षणी सहन करावा लागतो. आशाला चटके देणे, मारझोड करणे, उपाशी ठेवणे हे तर नित्याचेच होते, वरून आशाला आईचे विखारी बोलही क्षणोक्षणी ऐकून घ्यावे लागे, आशाची सतत हेटाळणी होत असे. आई नेहमी आपल्या इतर मुलींच्या रूपाची तुलना आशाशी करी. "हमारी आशा, सब में काली, मरतुकडी, सारखा रोतसो मूँ, चपली की सुरत की हाय"[३] आशाला मान खाली घालून गप्प ऐकून घेण्याशिवाय पर्याय नसे. आशाला आपल्या जीवनाची लढाई आपल्या एकटीलाच लढावी लागणार याची जाणीव होती. म्हणूनच ती गप्प सर्व काही सहन करत जीवनाची वाटचाल करत होती, त्यातूनच ती पुढे इतकी प्रगती करू शकली. आशा अपराध यांच्या या वाटचालीबद्दल आपले विचार व्यक्त करताना रवीन्द्र घवी म्हणतात, "दुबळी वेल झाडाला वेटाळत कधी कधी झाडापेक्षा उंच वाढते तसं या दुबळ्याा मुस्लीम स्त्रीचं व्यक्तिमत्व आहे. शिक्षणाच्या ओढीनं उंचावत गेलेलं दुबळं तरी चिवट व्यक्तिमत्व त्याची ही कथा प्रेरक आहे"४ आशा दुबळी असली तरी तिची शिकण्याची इच्छा शक्ती तीव्र आहे. शिक्षणातूनच आपण आपल्या सर्व दुःखावर मात करू शकतो याची जाणिव आशाला परिस्थितीने करून दिलेली आहे. त्यामुळेच ती मोठ्याा जिद्दीने शिकत राहते, आशा शिकून आपल्या पायावर उभी राहते.

'भोगले जे दुःख त्याला..' या आत्मचरित्रात ज्या विविध व्यक्तिरेखा येतात, त्यात महत्त्वाच्या व्यक्तिरेखा म्हणजे आशाचे वडील 'भई', आई माँ, पती दस्तगीर अपराध, 'भई' एक सज्जन गृहस्थ आहेत. आशाला ते नेहमीच मायेने वागवतात, वडील म्हणून आशासाठीचे त्यांचे कर्तव्य ते पार पाडण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांचा अकाली मृत्यू होतो आणि आशावर दुःखाचा डोंगर कोसळतो. आशाची आई अर्थात 'माँ' ही या आत्मचरित्रातील खूपसा भाग व्यापून टाकणारी व्यक्तिरेखा आहे. माँ ला वस्तू गहाण ठेवून आपली गरज भागवण्याची सवय आहे. तिनं कधी भांडी, हांडी, कधी दागिने तर कधी लग्नातला पटका, कधी मंगळसूत्र गहाण ठेवलं आहे. लेखिकेला वाटतं तिचं आयुष्यही माँने आपल्याकडे गहाण ठेवलं आहे.

माँच्या चेहऱ्यावर नेहमीच कठोरता आणि संताप असे. त्यामुळे तिच्यासमोर उभं राहून बोलण्याचं कोणाचं धाडस नसे. माँ ने लेखिकेच्या भावना कधी जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही, तिने कधीचं लेखिकेचे कौतुक केले नाही, एखादी सावत्र आई करणार नाही, एवढा छळ या सख्ख्या आईने लेखिकेचा केलेला आहे. घरात एक प्रकारची दहशत या माँची असलेली दिसून येते.

लेखिकेचा पती दस्तगीर अपराध व्यवसायाने ट्रक ड्रायव्हर, पुढे तो एस. टी. मध्ये कामाला लागतो. दस्तगीर हा सासूच्या सांगण्याप्रमाणे वागत असे, आपल्या बायकोला त्रास होईल असे वागणे म्हणजे सासूची मर्जी सांभाळणे अशी दस्तगीरची भावना होती. नवरा म्हणून त्याने कधीच लेखिकेला समजून घेतले नाही, सासू प्रमाणे तो ही लेखिकेचा उध्दार करायचा, लेखिकेला हाक मारताना ही तो "ए टॉंगे के टप के मूँह की"[५] असे हाक मारायचा.

'भोगले जे दुःख त्याला...' या आत्मचरित्रात समाज जीवनाचे चित्रण खूप मोठ्याा प्रमाणात आले आहे. मुस्लीम समाज जीवनातील धार्मिक रूढी, परंपरा, श्रध्दा, अंधश्रध्दा, सण-उत्सव यांचे चित्रण तर येतेच पण हिंदू धर्मातील सण-उत्सवांचे चित्रण ही मोठ्याा प्रमाणात यात आले आहे.

मुस्लीम एकत्र कुटुंब पध्दतीचे चित्रण या आत्मचरित्रात येते. मुस्लीम धर्मियांचे रमजान व बकरी ईद, मोहरम अशा सणांचे चित्रण या आत्मचरित्रातून येते. ईदच्या प्रसंगी घरात बनवले जाणारे पदार्थ, केली जाणारी प्रार्थना याचे चित्रण येते. 'मोहरम' कोल्हापूर परिसरात मोठ्याा प्रमाणात साजरा केला जातो. त्याचेही वर्णन लेखिका या आत्मचरित्रातून तपशीलवार करते. मुस्लीम पीरांचे उरूस साजरे केले जातात, या उरूसचे चित्रणही या आत्मचरित्रात येते.

लेखिका हिंदू कुटुंबाच्या सान्निध्यात दीर्घकाळ राहिल्याने आणि हिंदू-मुस्लीम एकोप्याने अनेक सण साजरे करत असल्याने या आत्मचरित्रात गणपती, गौरी, हादगा, दसरा, दिवाळी, सत्यनारायण अशा हिंदू सण-समारंभाचे चित्रण तपशीलवार करते. लेखिका या सर्व सण-समारंभात उत्साहाने सहभागी होते. हिंदू-मुस्लीम हा भेदभाव कधी लेखिकेला जाणवला नाही. आशा

अपराध म्हणतात, "हिंदूंचा सण, मुसलमानांची ईद असला दुजाभाव आम्हाला माहित नव्हता. निखळ आनंद घेताना धर्माच्या भिंतींनी कधी अडसर केला नाही. खरं तर धर्मांच्या भिंती असतात हे आम्हाला माहितच नव्हतं"[६] आशा अपराध यांच्या या आत्मचरित्रात सामाजिक एकात्मता येते. दक्षिण महाराष्ट्रातील रितीरिवाज दिसतात. हिंदू आणि बहुजन समाज यांचे एकत्रित नांदणे दिसते, एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे दिसते. जात, धर्म या पलिकडे जाऊन माणूसकीचे दर्शन घडवणारी सामाजिक एकात्मता जाणवते. या आत्मचरित्रातून आलेल्या सामाजिक एकात्मतेचे, धार्मिक सहिष्णुतेचे वर्णन करताना डॉ. राजेखान शानेदिवाण म्हणतात, "आशा अपराधांनी केलेले धार्मिक सहिष्णुतेचे वर्णन ही कोल्हापूरच्या मातीची परंपरा आहे. सर्वधर्म समभावाचे प्रतीक बनून हे दोन्ही समाज समोर येतात. ईद किंवा उरूस म्हणजे धार्मिक सहिष्णुतेबरोबर एकतेचे मानचिन्ह आहे"[७] सामाजिक, धार्मिक सहिष्णुता अनेक गावात आजही टिकून आहे आणि ती टिकून राहणे काळाची गरज आहे.

'भोगले जे दुःख त्याला...' या आत्मचरित्रात आलेली भाषा काव्यात्म तर आहेच त्याच जोडीला यात उपमा आणि अलंकाराचा उपयोग केला गेला आहे. या आत्मचरित्रात मराठी भाषेबरोबरच दख्खनीचाही उपयोग केला आहे. कोल्हापूर परिसरातील मराठी, हिंदी क्वचित उर्दू भाषेच्या वापरामुळे हे आत्मचरित्र अधिक वाचनीय बनत जाते. लेखिका मुस्लीम व्यक्तिरेखानुसार भाषेचे चित्रण करत जाते. लग्नानंतर आशा जेव्हा नवऱ्याबरोबर सिनेमाला जाऊन येते आणि ही गोष्ट आशाच्या आईला समजते. तेव्हा आशाची आई आशाला रागावत म्हणते, "लाज लगी नई क्या गे, चिपकल के मूँ की, मरद संगट शिनिमा को जाने को, लगेच सोकावे गई तो"[८] हिंदी बोलीभाषेतील अनेक शब्द या आत्मचरित्रात येतात. या आत्मचरित्रात येणारी विविध पात्रे, त्या पात्रांचे वर्तन, वर्तनाप्रमाणे येणारी त्यांची भाषा सारच काही मनाला भिडणारं आहे. त्यामुळेच अनिल डोंगरे म्हणतात, "या पुस्तकात हादरून सोडणारे अनेक प्रसंग आहेत. करूणा वाटते असे प्रेमाचे उमाठेही येतात, आत्मकथेत असंख्य व्यक्तिरेखा आहेत, त्या इतक्या ठसठशीत आहेत की, त्यांच्या वर्तनातूनही आशाचं व्यक्तिमत्व काही अंशी उलगडत जातं. यातली हिंदी भाषाही वेगळीच आहे"[९] भाषिक सौंदर्याने नटलेले हे आत्मचरित्र वाचकांच्या मनाची पकड घेतं या आत्मचरित्राचे वैशिष्ट्यो सांगताना विजय पोवार म्हणतात, "कोणताही आग्रही अभिनिवेश न घेता लिहिलेले हे चरित्र एका मुस्लीम स्त्रीचे चरित्र, तिच्या भाषेचे, तिच्या समजूतीचे, तिच्या कर्ते-नाकर्तेपणाचे जसे आहे तसेच सामाजिक समन्वय प्रक्रियेचे आहे"[१०] आशा अपराध यांनी आपल्या जीवनात जे काही सहन केले ते सहन करून रडत कुडत न बसता जिद्दीने आपले लक्ष गाठले. त्यामुळे त्यांचे हे आत्मचरित्र प्रत्येक स्त्री-पुरूशाला बळ देणारे ठरते यात तिळमात्र शंका नाही.

### *संदर्भ ग्रंथ*

१.अपराध आशा, 'भोगले जे दुःख त्याला', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, पुनर्मुद्रण ऑगष्ट, २०१४, (मनोगत), पृ. ७.
२.तत्रैव, (मनोगत), पृ. ६.
३.तत्रैव, पृ. २७.
४.घवी रवीन्द्र, अपराध आशा, दैनिक गोमन्तक पणजी, सहवास, रविवार दिनांक २१ डिसेंबर २००८.
५.अपराध आशा, 'उनि', पृ. ६२.
६.तत्रैव, पृ. २५.
७.शानेदिवाण राजेखान, 'मुस्लीम आत्मचरित्रे : एक दृष्टिक्षेप', भूमी प्रकाशन लातूर, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २०१०, पृ. १७४.
८.अपराध आशा, 'उनि', पृ. ५२.
९.डोंगरे अनिल, 'मूर्तिमंत जिद्द उभी !', महाराष्ट्र टाईम्स, ८ मार्च २०१२.
१०.पोवार विजय शंकर, 'जळतच, उजळत जाणारी आशा', रविवार सकाळ, २८ सप्टेंबर २००८.



*प्रा. डॉ. शकील शेख*
*प्रमुख, मराठी विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,*
*ता. बार्शी, जि. सोलापूर,*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com